# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः05.04.2025** **वारःशनिवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी तीन दिवसांच्या श्रीलंका दौऱ्यावर, द्वीपक्षीय संबंध दृढ करण्यावर चर्चा होणार
2. आंतर संसदीय संघाच्या बैठकीसाठी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला करणार संसदीय शिष्टमंडळाचे नेतृत्व
3. संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन संस्थगित, अधिवेशन फलदायी ठरल्याचं रिजीजू याचं प्रतिपादन
4. रेल्वेच्या 4 नव्या प्रकल्पांना मंत्रिमंडळाची मंजुरी आणि
5. आयपीएलमध्ये लखनौ सुपर जायटंस्चा मुंबई इंडियन्सवर 12 धावांनी विजय

**<u>पंतप्रधान श्रीलंका</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी काल संध्याकाळी तीन दिवसीय श्रीलंका दौऱ्यासाठी कोलंबो इथं पोहोचले. श्रीलंकेच्या उच्चस्तरीय मंत्र्यांनी त्यांचं स्वागत केलं. पंतप्रधान मोदी आज श्रीलंकेचे पंतप्रधान अनुरा कुमारा दिसानायके यांच्यासाठी द्वीपक्षीय चर्चा करतील. भारताच्या शेजारी राष्ट्रांना प्राधान्य देण्याच्या धोरणाचा श्रीलंका अविभाज्य भाग असून या भेटीत उर्जा, व्यापार, संपर्कजाळे, डिजीटलायझेशन आणि संरक्षण या क्षेत्रांमध्ये उभय देशांचे संबंध दृढ करण्याच्या हेतूने व्यापक चर्चा करतील. मोदी यांची श्रीलंकेला ही चौथी भेट असून, स्थानिक भारतीय समुदायाकडून त्याचं पारंपरीक पद्धतीने स्वागतही करण्यात आलं. उभय देशांच्या पंतप्रधानांमध्ये होणाऱ्या चर्चेनंतर विविध क्षेत्रात भारत समर्थित उपक्रमांची घोषणा करण्यात येणार आहे. याव्यतिरिक्त समपूर सौर उर्जा प्रकल्पाच्या पायाभरणी प्रकल्पात दोन्ही देशाचे दूरदृश्य प्रणालीद्वारे सहभागी होतील.

**<u>बिमस्टेक</u>**

बिमस्टेक परिषदेच्या पार्श्वभुमीवर काल नेपाळचे पंतप्रधान केपी शर्मा ओली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्वतंत्र बैठक पार पडली. उभय नेत्यांमध्ये अर्थपूर्ण आणि विधायक चर्चा झाल्याचं नेपाळच्या पंतप्रधानांनी त्यांच्या समाजमाध्यमांवरच्या संदेशात म्हटलं आहे. तर नेपाळशी असलेल्या संबंधांना भारत प्राधान देत असल्याचं पंतप्रधान मोदी यांनी नमूद केलं आहे. द्वीपक्षीय संबंध आणि प्रादेशिक सहकार्य तसंच बिमस्टेक शिखर परिषदेतील सकारात्मक बाबींविषयीही उभय नेत्यांनी चर्चा केली.

**<u>धनखड</u>**

कृत्रिम बुद्धिमत्तेचा सामान्य नागरिकांवर होणारा परिणाम हा नियामक व्यवस्थेचा केंद्रबिंदू असला पाहिजे असं मत उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी व्यक्त केलं. दिल्लीत काल एका पुस्तक प्रकाशन कार्यक्रमाला संबोधित करताना ते बोलत होते. नागरिकांना कृत्रिम बुद्धिमत्तेपासून संरक्षण देण्यासाठी अंमलबजावणी करता येण्याजोग्या अधिकारांची आवश्यकता असण्यावर त्यांनी भर दिला. भारताने सायबर सार्वभौमत्व ठामपणे मांडले पाहिजे त्याचबरोबर ते जागतिक मानकांशी जुळणारे असावे असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<u>बिर्ला-ताश्कंद</u>**

लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, उझबेकिस्तानमध्ये आजपासून आयोजित आंतर-संसदीय संघाच्या दीडशेव्या बैठकीत सहभागी होणाऱ्या करणाऱ्या संसदीय शिष्टमंडळाचे नेतृत्व करतील. सामाजिक विकास आणि न्याय यासाठी संसदीय कृती या विषयावर होणाऱ्या उच्चस्तरीय सर्वसाधारण चर्चेला बिर्ला संबोधित करतील. या शिष्टमंडळात राज्यसभेचे उपसभापती हरिवंश तसेच भर्तृहरी महताब, अनुराग सिंग ठाकूर, डॉ. सस्मित पात्रा, अशोक कुमार मित्तल, किरण चौधरी आणि लता वानखेडे या खासदारांचा समावेश आहे. तसंच हे खासदार आहेत. भारतीय संसदीय शिष्टमंडळाचे सदस्यही सहभागी होतील. या भेटीदरम्यान, बिर्ला उझबेकिस्तानमधील भारतीय समुदायाच्या सदस्यांशी आणि भारतीय विद्यार्थ्यांशी देखील संवाद साधणार आहेत.

**<u>संसद कामकाज</u>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन काल संस्थगित झालं. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी केलेल्या वक्तव्यावरून सुरूवातीला लोकसभेचं कामकाज तहकूब करण्यात आलं. कोषागार समितीनं या वक्तव्याविषयी माफी मागितली. त्यानंतर दुपारी बारा वाजता सभागृहाचं कामकाज पुन्हा सुरू झालं तेव्हा लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी गांधी यांनी केलेली टीका दुर्देवी आणि संसदीय लोकशाहीच्या प्रतिष्ठेच्या विरोधी असल्याचं सांगून अनिश्चित काळासाठी सभागृहाचं कामकाज तहकूब केलं. 31 जानेवारी रोजी सुरू झालेल्या या अधिवेशनात, लोकसभेत 118 टक्के काम झालं आणि 16 विधेयकं संमत झाल्याचं सभापती ओम बिर्ला यांनी सांगितलं. तर राज्यसभेत या अधिवेशन काळात 119 टक्के कामकाज झालं; आणि 14 विधेयकं संमत झाली असं अध्यक्ष जगदीप धनखड यांनी सांगितलं.

**<u>रिजीजू संसद</u>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन फलदायी ठरल्याचं संसदीय कामकाज मंत्री किरने रिजीजू यांनी म्हटलं आहे. अधिवेशनानंतर वार्ताहरांशी बोलताना रिजीजू यांनी वक्फ विधेयकावर सर्वात दीर्घ चर्चा झाली तसंच त्यात कोणत्याही प्रकारचा व्यत्यय आला नाही असं नमूद केलं.

**<u>रेल्वेमं त्रिमंडळ</u>**

रेल्वे मंत्रालयाच्या सुमारे 18 हजार 658 कोटी रुपये खर्चाच्या 4 प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या बैठकीनंतर नवी दिल्लीत माध्यमांना ही माहिती दिली. महाराष्ट्रातल्या गोंदिया-बल्लारशाह रेल्वेमार्गाचं दुपदरीकरण, तसंच गडचिरोली आणि मध्य प्रदेशातल्या राजनंदगाव या आकांक्षित जिल्ह्यांमधे मिळून 19 नवीन रेल्वे स्थानकांच्या उभारणीच्या कामांचा या प्रकल्पांमधे समावेश आहे. या प्रकल्पांमुळे इंधन तेलावरचा खर्च वाचून कार्बन उत्सर्जनाचं प्रमाणही कमी होईल. तसंच यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होईल असं वैष्णव यांनी सांगितलं. देशाच्या सीमा भागातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी, पूर्णपणे केंद्रपुरस्कृत असलेल्या व्हायब्रंट व्हिलेजेस या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यालाही केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली.

**<u>तामिळनाडू</u>**

केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव आजपासून तामिळनाडूच्या दोन दिवसांच्या दौऱ्यावर जात आहेत. त्यांच्या भेटीदरम्यान, वैष्णव आधुनिकीकृत पंबन रेल्वे पुलाच्या उद्घाटनाच्या अंतिम तयारीचे निरीक्षण करण्यासाठी रामेश्वरमला भेट देतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवीन पांबन रेल्वे पुलाचे उद्घाटन करण्यासाठी राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत,हा

देशातील पहिला उभ्या लिफ्ट सागरी पूल आहे. पंतप्रधान रोड ब्रिजवरून एका रेल्वे आणि जहाजाला हिरवा झेंडा दाखवतील आणि पुलाच्या कामकाजाचे निरीक्षण करणार आहेत. त्या रेल्वेमध्येही वैष्णव चढणार आहेत.

**गुजरात सागरी दिन**

भारताच्या अर्थव्यवस्था आणि व्यापारात सागरी उद्योगाची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करणारा राष्ट्रीय सागरी दिवस आज साजरा केला जाणार आहे. या ओळखीचा एक भाग म्हणून विरासत भी, विकास भी या दृष्टीकोनाअंतर्गत गुजरातमध्ये अहमदाबाद इथं पहिलं राष्ट्रीय सागरी वारसा संकुल विकसित करण्यात येत आहे. या वर्षाच्या अखेरीपर्यंत या प्रकल्पाचा सहा संग्रहालयांचा पहिला टप्पा कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. एकंदर 400 एकर जमिनीवर 4500 कोटी रुपयांच्या अंदाजे खर्चाने बांधण्यात येणाऱ्या या संकुलात लोथल मिनी रिक्रिएशनसह चार इतर थीम पार्क असतील.

**गोयल स्टार्टअप महाकुंभ**

नवोन्मेष आणि तंत्रज्ञानाधारीत विकासात भारत जागतिक नेता म्हणून उदयास येईल असं प्रतिपादन वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल केलं. नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं कालपासून स्टार्टअप महाकुंभ कार्यक्रमाच्या दुसऱ्या आवृत्तीला सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. भारतीय तरूण जग काबीज करण्यास उत्सुक आणि सज्ज असल्याचं नमूद करून स्टार्टअप महाकुंभ कार्यक्रमाचं कौतुक केले. या आवृत्तीत 3 हजारांहून अधिक स्टार्टअप्स, एक हजाराहून अधिक गुंतवणूकदार आणि व्यवसाय विकास संस्था आणि 50 हून अधिक देशांतील सुमारे दहा हजार प्रतिनिधी सहभागी आहेत.

**एनआयए**

एप्रिल 2मध्ये पल्लकड इथं झालेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेते एस. श्रीनिवास यांच्या हत्येतील मुख्य हल्लेखोराला केरळमध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणेने अटक करण्यात यश मिळवलं आहे. शमनाद इल्लिकल असं या हल्लेखोराचं नाव आहे. बंदी घातलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाने ही हत्या घडवून आणली होती. इल्लिकलवरर सात लाख रुपयांचे बक्षीस होते आणि तो गेल्या तीन वर्षांपासून फरार होता.

**चीनउत्तर-अमेरिका रोखेबाजार**

अमेरिकेने लागू केलेल्या निर्यात शुल्काच्या निर्णयाला प्रत्युत्तर देताना, चीनने अमेरिकन वस्तुंवर 34 टक्के अतिरिक्त कर लादण्याची घोषणा केली. अमेरिका-चीन यांच्यातल्या व्यापारयुद्धामधील ही सर्वात मोठी वाढ असून, यामुळे मंदी येण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जागतिक आघाडीच्या दोन अर्थव्यवस्थांमधील संघर्षात, चीनने काही निर्यातीवर बंधने आणली आहे तसंच जागतिक व्यापार संघटनेत तक्रारही केली आहे. चीनच्या या प्रत्युत्तराचा परिणाम अमेरिकेच्या रोखे बाजारावर दिसून आला आणि मोठ्या प्रमाणात रोखे विक्री झाली.

**राष्ट्रीय खोखो**

जगन्नाथ पुरी इथं काल झालेल्या 57 व्या राष्ट्रीय अजिंक्यपद खो खो स्पर्धेच्या अंतिम सामन्यात महाराष्ट्राच्या महिला संघाने दिमाखदार खेळी करत विजेतेपदावर आपलं नाव कोरलं. त्यांनी यजमान ओडिशावर 25-21 असा थरारक विजय मिळवला. प्रियांका इंगळे, रेश्मा राठोड आणि अश्विनी शिंदे या अजिंक्य पदाच्या शिल्पकार ठरल्या. या स्पर्धेत देशातील सर्वोत्कृष्ट खेळाडूचा राणी लक्ष्मीबाई पुरस्कार धाराशिव जिल्ह्याच्या तन्वी भोसले हिला जाहीर झाला. दरम्यान

पुरुष संघाला या स्पर्धेत उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं. पुरुष गटातल्या अंतिम सामन्यात रेल्वेच्या संघानं गतविजेत्या महाराष्ट्रावर 36-28 असा विजय मिळवला.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल लखनऊ सुपर जायंटस् संघानं मुंबई इंडियन्स संघावर 12 धावांनी विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना लखनऊच्या संघानं 20 षटकांत 8 गडी बाद 203 धावा केल्या. त्याला प्रत्युत्तर देताना मुंबईच्या संघाला 5 गडी बाद 191 धावा करता आल्या. आज दुपारी चेन्नई सुपरकिंग्ज विरूद्ध दिल्ली कॅपिटल्स, तर संध्याकाळी किंग्ज इलेवन पंजाब विरूद्ध राजस्थान रॉयल्स हे सामने होणार आहेत.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.